# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९४–२०१०/ दिनांक :

श्री. श्रीधर मनोहर कुलकर्णी,
मु.पो. कोळेगीरी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री.जी. बी.पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. श्रीधर मनोहर कुलकर्णी, मु.पो. कोळेगीरी, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे घरगुती कारणासाठी नवीन वीज पुरवठा मिळणेसाठी दि. १५.१.२०१० रोजी अर्ज दाखल केला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरजतुदीनुसार त्यांना १४.२.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते, परंतु तसे झाले नाही. त्यामुळे कृती मानकाचा भंग झाला आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दिली आहे.

कक्षाने चलन देणेबाबत दि. १.४.२०१० रोजी आदेश दिले आहेत. चलन मुदतीत न मिळालेमुळे प्रस्तुत तक्रार मंचाकडे दि. १४.४.२०१० ला दाखल करुन कृती मानकातील तरतुदीनुसार चलन मिळेपर्यंत भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने दि. १२.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांचा मागणी अर्ज दि. १५.१.२०१० ला प्राप्त झाल्याचे मान्य केले व त्यांस दि. ७.५.२०१० रोजी चलन देण्यात आले. सांगली कक्षाचा क्र. ४२७३ ता. १.४.२०१० ने आदेश पारित झाला आहे.

प्रस्तुत तक्रार मंचाकडे सुनावणीसाठी दि. १८.५.२०१० ला ठेवली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, श्री. ए.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महंकाळ विभाग हजर होते. त्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले आहे. तथापि वि.प. यांनी तक्रारदारायने नुकसान भरपाई नको असल्याचे पत्र २ दिवसांत हजर करतो असे सांगितले. त्याप्रमाणे वि.प. यांनी दि. १९.५.२०१० रोजी दंड वा नुकसान भरपाई नको असल्याचे तक्रारदाराचे दि. ७.५.२०१० चे पत्र फॅक्सद्वारे मंचास पाठविले ते प्राप्त झाले. त्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मागे घेतल्याने निकाली काढण्यात येत आहे.

२) भरपाई बाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :